# सत्यनारायणाची सत्यकथा




प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय

परमपिता शिव परमात्म्याने स्वत:प्रजापिता ब्रह्मा यांच्या द्वारे जे ज्ञान दिले त्याच्याच आधारे हे पुस्तक लिहिण्यात आले आहे.

# सत्यनारायणाची व्रत कथा

भारतात सत्यनारायण व्रत फार लोकप्रिय आहे, कारण सत्यनारायण नवसाला पावतो अशी भाविकांची दृढ श्रद्धा आहे. या व्रताची सांगता ते पूजा करून व कथा ऐकून करतात. सांप्रत या पूजेला सोहळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. विवाहानंतर नवदांपत्याने ही पूजा करण्याचा प्रघात सर्वत्र दिसून येतो. तसेच हे काम्य व्रत असल्याने वर्षाच्या कोणत्याही दिवशी करण्याची प्रथा आहे. महाराष्ट्रात तर सत्यनारायणाची पूजा वैयक्तिक व सार्वजनिक रीत्याही करतात.

सत्यनारायण व्रत-कथेत[१] लिहिलेले आहे की, "हे व्रत पीडा, दु:ख इत्यादी नष्ट करणारे, धन-धान्य वृद्धिंगत करणारे, सौभाग्यदायी व सर्वत्र यश मिळवून देणारे आहे. हे व्रत केल्याने व त्याची कथा ऐकल्याने माणूस सर्व पापांपासून मुक्त होतो आणि इहलोकी सुखाने जीवन व्यतीत करीत अंती मुक्ती व वैकुंठात देवपद

---

१. ही व्रत -कथा स्कंद पुराणाच्या रेवा खंडातील शेवटच्या पाच अध्यायांत दिलेली आहे. त्यात म्हटले आहे की, ही कथा नैमिषारण्य तीर्थात व्यासशिष्य सूताने शौनकादी अठ्ठ्याऐंशी हजार ऋषींना ऐकविली. त्यात असेही लिहिलेले आढळते की, मृत्युलोकातील दु:ख पाहून त्याच्या निवारणार्थ जेव्हा नारदाने भगवंतांना त्यावर उपाय विचारला होता तेव्हा त्यांनी ही कथा त्याला ऐकविली होती. पण आश्चर्य म्हणजे ही कथा कोणती हे त्यात सांगितलेले नाही, केवळ तिचे माहात्म्य वर्णिलेले आहे.

काही वर्षांपूर्वी गोरखपूरच्या गीता प्रेसने 'कल्याण' मासिकात स्कंद पुराणाचा हिंदी अनुवाद छापला होता. त्यात त्यांनीही मुळ पोथीत अशी कोणतीच कथा नसल्याचे मान्य केले आहे.

प्राप्त करतो. पृथ्वीवर जेव्हा हे व्रत लोक करतील तेव्हा त्यांची सर्व दु:ख अवश्य नष्ट होतील.'' अशा रीतीने सर्व मनोकामना पूर्ण होतात असे या कथेत लिहिलेले आहे.

**यात सत्य स्वरूपाचे ज्ञान, श्री नारायणाचे चरित्र किंवा श्रेष्ठ व्रताचे वर्णन आहे का ?**

असे हे या व्रताचे व कथेचे इतके मोठे माहात्म्य वाचल्यावर प्रत्येक माणसाला आपणही हे व्रत करावे, कथा ऐकावी आणि सुख – शांती, मुक्ती – जीवन्मुक्ती, यश, सौभाग्य व विपुल धन – धान्य प्राप्त करावे असे वाटणे साहजिकच आहे. परंतु जेव्हा तो प्रचलित 'सत्यनारायण व्रत–कथा' वाचतो वा ऐकतो तेव्हा त्यात **श्री नारायणाचे कोणतेही चरित्र, सत्य** स्वरूप परमात्म्याचा कसलाही परिचय तसेच हे व्रत केल्याने उपरोक्त श्रेष्ठ प्राप्ती होऊ शकते असे मनाला पटणारे **या व्रताबद्दलचे** स्पष्टीकरण दिलेले नसल्याचे पाहून त्याला आश्चर्य वाटते. त्यात व्रताची खरी कथा न देता, अमक्याने हे व्रत केल्याने त्याला विपुल धन–धान्य, मुक्ती व वैकुंठपद यांची प्राप्ती झाली व तमक्याने ते व्रत करण्याचा नवस करूनही तो फेडला नाही किंवा प्रसाद घेतला नाही त्यामुळे त्याच्यावर दु:खांचे व संकाटांचे डोंगर कोसळले याविषयीच्याच केवळ कथा लिहिलेल्या आढळतात.

उदाहरणार्थ त्यातील पहिलीच कथा अशी आहे. काशीपुरात शतानंद नावाचा एक अत्यंत गरीब कुटुंबवत्सल ब्राह्मण भिक्षा मागून कसेबसे जीणे जगत होता. एक दिवस तो अगदी थकून भागून गेला होता. त्यावेळेस भगवंतानी एका **वृद्ध ब्राह्मणाच्या रूपाने** त्याला दर्शन दिले आणि सत्यनारायणाचे व्रत करण्यास सांगितले. शतानंदाने ते केले आणि त्याला विपुल धन–धान्य व सुखाचा लाभ झाला. पुढे तो ते न विसरता प्रत्येक महिन्याला करीत राहिला व अंती मुक्तीस पावला

दुसरी कथा एका गरीब मोळीविक्या भिल्लाची आहे. एके दिवशी काशीपुरात तो मोळी विकण्यास गेला. तहान लागल्याने तो शतानंदाच्या घरी आला व त्याने पिण्यास पाणी मागितले. शतानंदाचे ते वैभव पाहून हा निष्कांचन ब्राह्मण एकाएकी इतका श्रीमंत कसा झाला याचा त्याला फारच विस्मय वाटला. त्याने शतानंदाला त्याचे कारण विचारले. शतानंदाने मोकळ्या मनाने त्याला सारे काही सांगितले आणि तूही ते व्रत कर असे त्याला म्हटले. मग भिल्लानेही सत्यनारायण व्रत केले आणि तो दुःख, पीडा व दारिद्र्यापासून मुक्त झाला व अंती **वैकुंठात देवपदाला** प्राप्त झाला.

**कथेत वर्णिलेल्या व्रताने इतकी श्रेष्ठ प्राप्ती होणे शक्य आहे का ?**

आता विचार करण्याजोगी गोष्ट आहे की, सत्यनारायण व्रताचा सध्या जो प्रचलित विधी आहे त्यानुसार आचरण केल्याने इतकी श्रेष्ठ प्राप्ती होणे शक्य आहे का ? व्रताचा प्रचलित विधी असा आहे. लोक सकाळपासून उपवास करतात, सत्यनारायणाची षोडशोपचारे विधिपूर्वक नैवेद्य वगैरे दाखवून पूजा करतात, नंतर तास–दीड तास कथा श्रवण करून तीर्थप्रसाद ग्रहण करतात आणि आप्तमित्रांसमवेत मिष्ठान्नाचे भोजन घेतात. खरे पाहता, पुस्तकाच्या आरंभी ज्याचे माहात्म्य वर्णन केलेले आहे ते महान व्रत या प्रचलित व्रताहून वेगळे आणि उच्च कोटीचे असले पाहिजे हे स्पष्ट आहे. अन्यथा, केवळ काही तास उपवास करून व्रत केल्याने किंवा एक दिवस सव्वा माप पदार्थ घेऊन तयार केलेला नैवेद्य दाखवून आणि गोडधोड खाऊन मौज मारल्याने संपूर्ण सुखाची किंवा मुक्ती–जीवन्मुक्तीची प्राप्ती होऊ शकली असती आणि या जीवनातच माणूस गरिबी व दुःखांपासून मुक्त होऊन सुख–संपत्ती प्राप्त करू शकला असता तर या अत्यंत सोप्या उपायाचा अवलंब कोणीही न चुकता केला असता. एवढेच काय पण नास्तिक साम्यवादी लोकांनीही क्रांतीचा विचार सोडून देऊन हे व्रत करण्यालाच सर्वोत्तम उपाय

मानला असता. तसेच आज जेथे देशात अठराविश्वे दारिद्रच आहे आणि लक्षावधी लोक भूकेने कासावीस होऊन आक्रोश करीत आहेत तेथे सरकारने हे व्रत केले असते व लोकांनाही करावयास सांगितले असते. पण देशाला सुख–संपत्ती लाभेल आणि लोकांना मुक्ती–जीवन्मुक्तीची प्राप्ती होईल असे वैशिष्टच काही या तथाकथित व्रतात आढळत नाही. आता या व्रत – कथेतील मुख्य कथा वाचल्यावर आपल्या लक्षात येईल की, त्यात सत्य स्वरूप परमात्म्याचा परिचय, श्रीनारायणाचे चरित्र आणि खरे व्रत यांचा कोठेही उल्लेख केलेला नाही.

## कथेतील वर्णिलेले वृतांत कितपत संभवनीय आहेत आणि त्यांचा वास्तविक आशय काय आहे?

सत्यनारायण व्रत-कथेतील जी सर्वात मोठी कथा लिहिण्यात आली आहे ती थोडक्यात अशी आहे. रत्नपुरात साधू नावाचा एक वाणी राहत होता. त्याला संतान नव्हते. म्हणून त्याने मूलबाळ झाल्यावर सत्यनारायण व्रत करू असा नवस केला. यथाकाळी त्याला एक कन्या झाली. तिचे नाव त्याने कलावती असे ठेवले. पण साधुवाणी काही नवसाला जागला नाही. कन्येच्या लग्नप्रसंगी करू असे म्हणून त्याने व्रताची चालढकल केली. पुढे कलावतीचे लग्न झाले पण व्रत करण्यास तो सोयिस्करपणे विसरला. सासरे-जावई मग एका सुमुहूर्ती व्यापारासाठी नौकेत माल भरून दूरदेशी निघाले. वाटेत नर्मदातीरी एका नगरात ते उतरले. पण तेथे सत्यनारायणाच्या **अवकृपेने** चोरीचा आळ येऊन ते तेथील राजाच्या कैदेत पडले. सासरे-जावई बरेच दिवस होऊनही परतले नाहीत. म्हणून ते सुखरूप परत यावेत यासाठी साधुवाण्याची पत्नी लीलावती व मुलगी कलावती यांनी सत्यनारायण व्रत केले. त्याने सत्यनारायण प्रसन्न झाला. त्या दिवशी सत्यनारायणाने राजाच्या स्वप्नात येऊन त्या

दोघांना सोडून देण्याची त्यास आज्ञा केली. राजाने लगेच त्या दोघांची मुक्तता करून त्यांचा जप्त केलेला माल व संपत्ती त्यांना परत दिली.

नंतर सासरे-जावई नौकेत बसून नदीमार्गे परत आपल्या घरी यावयास निघाले. त्यावेळेस सत्यनारायण एका तापसाच्या रूपाने त्यांच्यापुढे आला आणि त्याने साधुवाण्यास विचारले," अरे वाण्या, तुझ्या नौकेत काय् आहे?" साधुवाणी म्हणाला, "**काही घेण्याचा आपला विचार आहे काय? यात तर केवळ पालापाचोळा भरलेला आहे**". त्यावर तापस म्हणाला, "तथास्तु," त्याचा परिणाम नौकेतील **सोने-चांदी, रत्ने-मोती इत्यादींचे रूपांतर पालापाचोळा होण्यात झाला**. ते पाहून साधुवाणी अत्यंत दुःखी झाला. तो तापसाला शरण गेला. तेव्हा आपल्या खऱ्या रूपात प्रकट होऊन सत्यनारायण त्यास म्हणाला, "नवस करूनही तू माझी पूजा व व्रत केले नाहीस म्हणून **माझ्याच इच्छेमुळे तुला ही सारी दुःखे भोगावी** लागत आहेत." तेव्हा तो वाणी म्हणाला, "**तुझ्याच मायेने मोहित होऊन मी व्रत करावयाचे विसरलो होतो. व्रत करण्याचे आता मी तुला आश्वासन देतो." तेव्हा सत्यनारायण प्रसन्न झाला आणि पालापाचोळ्याच्या जागी पूर्ववत सोने-चांदी, रत्ने-मोती वगैरे प्रकट झाले**. नंतर सासरे-जावई आपल्या गावातील बंदरात येऊन पोहोचले. ही बातमी समाजताच मायलेकी करीत असलेली सत्यनारायणाची पूजा आटोपून बंदरावर भेटावयास निघाल्या. पण कलावती **प्रसाद घेतल्यावाचून भेटायला गेल्यामुळे नौका पाण्यात बुडली व तिचा पतीही त्यात नष्ट झाला. हे पाहून मातापिता व कन्या दारुण शोक करू लागले. तेव्हा आकाशवाणी झाली की, "कलावती प्रसाद न घेता आली आहे. तिने आदराने प्रसाद भक्षण करून यावे म्हणजे मग तिचा पती तिला परत मिळेल.**" तिने तसे करताच बुडालेली नौका तिच्या पतीसहित वर आली. नंतर जावयासहित आपल्या कन्येचा हात धरून साधुवाणी स्वगृही परतला. हा प्रकार पाहून जमलेल्या लोकांना फारच आश्चर्य वाटले.

साधुवाण्याच्या वरील कथेवर बुद्धिनिष्ठपणे विचार केल्यास कथेत हे जे लिहिले आहे की, "**सोन्या चांदी इत्यादींचा पालापाचोळा बनला आणि सयनारायण प्रसन्न झाल्यावर पालापाचोळ्याचे पुन्हा सोन्याचांदीत रूपांतर झाले." ते आपण खात्रीने अघटीतच मानाल. त्याचप्रमाणे कलावतीने प्रसाद न घेतल्याने तिच्या पतीसहित नौका पाण्यात बुडणे आणि नंतर तिने प्रसाद भक्षण केल्यावर नौका पाण्यातून वर येऊन तिचा पती प्रकट होणे ही घटनाही अशक्यप्राय वाटते**. कोणी मग भक्तिरसात वाहत जाऊन प्रत्येक घटना खरी मानो परंतु बुद्धी व ज्ञानाच्या कसोटीवर घासून पाहिल्यास हे वृतांत म्हणजे एका भक्तिप्रधान मानवी मनाचा कल्पनाविलास वाटतो. वास्तविक पाहता सत्य-स्वरूप परमात्मा व श्री नारायण यांचे फार मोठे माहात्म्य असून व्रतही श्रेष्ठ फळ देणारे आहे पण लोकांनी खऱ्या कथेचा आशय अशा तऱ्हेने वर्णन करून सारा मामलाच बिघडून टाकला आहे.

याशिवाय, "भगवंत, **मी तुझ्या मायेने मोहित होऊन व्रत करावयाचे विसरून गेलो होतो**" किंवा **सत्यनारायणाची अवकृपा झाली आणि त्याने म्हटले की, "माझ्याच इच्छेमुळे तुला ही सारी दु:खे भोगावी लागत आहेत,**" इत्यादी इत्यादी जे कथेत लिहिण्यात आले आहे ते सर्व भगवान श्री नारायणाचे स्वरूप व स्वभाव यांच्या विरुद्ध आहे. [२] भगवान तर सदा आनंद स्वरूप, दु:खहर्ता व कल्याणकारी आहे, तो अवकृपेने कोणासही दु:ख देत नाही. तो सुख-शांतीचा दाता व सर्वहितकारी आहे, माणूस दु:खी होतो तो आपल्याच वाईट कर्मांमुळे तसेच भगवान तर मायातीत आहे, त्याला माया कदापीही लवमात्रही स्पर्श करणे शक्य नाही. तेव्हा,

२. प्रत्यक्ष या व्रत-कथेच्या आरंभीच लिहिलेले आहे की, जो माणूस दयाळू, निष्पाप आणि निर्विरोधी असतो तो श्री नारायणसमान होय. तर मग वैर मनात बाळगून किंवा रुष्ट होऊन (अवकृपा) नारायण दु:ख देणे कसे शक्य आहे?

'भगवंताच्या मायेने एखादा मोहित होतो' असे म्हणणे अगदी अनर्थकारी आहे. याशिवाय, कथेत तापसाच्या रूपाने भगवंताचे येणे आणि रुष्ट होऊन साधुवाण्याच्या सोन्याचांदीचे पालापाचोळ्यात रूपांतर करणे व त्याने दुःख प्रदर्शित करताच, "माझी पूजा न केल्याने, माझ्याच इच्छेमुळे तुला ही दुःखे भोगावी लागत आहेत," असे त्यास म्हणणे वगैरे जे उल्लेख आहेत ते भगवंताचे स्वरूप आणि अवतरणाची रीती-नीती इत्यादींच्या विरुद्ध असून भगवंताच्या माहात्म्याला कमीपणा आणणारे आहेत. भगवंताचा जन्म व त्याची कर्तव्ये दिव्य आहेत. [३]आणि दिव्यतेचा अर्थ अशाप्रकारे तापसाचे रूप धारण करून एखाद्याला आपल्या इच्छेनुसार दुःखात लोटणे नाही.

## खरे व्रत आणि खरे उद्दिष्ट

अशारीतीने विचार केल्यास या निर्णयाप्रत येऊन पोहोचणे साहजिकच आहे की, भगवंताने वृद्ध ब्राह्मणाच्या रूपात येऊन करण्यास सांगितलेले आणि इतके श्रेष्ठ माहात्म्य असलेले हे व्रत दुसरेच कोणते व्रत असले पाहिजे तसेच भगवंताच्या कथनाचे (कथा) उद्दिष्टही काही वेगळेच होते. यावर आता आपण थोडा विचार करू या.

स्कंद पुराणात ही कथा नैमिषारण्य तीर्थात एकविण्यात आली होती असे लिहिलेले आहे. हे नैमिषारण्य सीतापूर जिल्ह्यात आहे पण आध्यात्मिक दृष्ट्या पाहिले तर या ठिकाणी मन हेंच **नैमिषारण्य** आहे कारण निमिषात (पापणी लवण्सास लागणारा काळ) जेथे आत्म्याचा अनुभव येईल तेच नैमिष तीर्थ होय. वनाला 'अरण्य' असे म्हणतात. जेव्हा आपण आपल्या मनाला निर्जन वनासारखे करतो म्हणजे कोणत्याही देहधारी व्यक्तीऐवजी एक परमात्म्याच्याच

---

३. या विषयी आमचेच 'परमात्म्याचे अवतरण कधी, का व कसे ?' हे पुस्तक वाचावे.

स्मृतीत स्थिरावतो तेव्हा 'भृकुटी' रूपी कुटीत बसून आत्म्याला आपल्या 'स्वरूपाचा' अनुभव होतो.

आता **'तीर्थ'** शब्दाकडे थोडेसे लक्ष देणे आवश्यक आहे. **'तारणारे ते तीर्थ' असे म्हणतात.**[४] म्हणून तीर्थ एखाद्या वनात किंवा जलाशयाच्या ठिकाणी असण्याची गरज नाही, उलटपक्षी दिव्य गुणांची धारणा व पवित्रता म्हणजेच खरे तीर्थ होय. ज्यात 'सत्यनारायण व्रत-कथा' सापडते त्या प्रत्यक्ष स्कंद पुराणातील काशी खंडात म्हटले आहे की, "सत्य, क्षमा, दया, इंद्रियनिग्रह, मधुर वचन, संतोष इत्यादि सर्व तीर्थ आहेत.[५] म्हणून मनरूपी वचनात या दिव्य गुणांची धारणा करून एकाग्रतेने बसणे म्हणजेच नैमिषारण्यात व्रत-कथेसाठी तयार होणे होय.

आता 'व्रत' म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. वास्तविक कोणताही नियम किंवा दिव्य गुण आत्मसात करण्यासाठी दृढनिश्चयी राहणे यालाच व्रत घेणे म्हणतात.[६] या दृष्टिकोनातून पाहिल्यास 'ब्रह्मचर्य' तसेच 'इंद्रियनिग्रह' हेच सर्वोत्तम तीर्थ आणि सर्वोत्तम व्रत होय. ज्यात सत्यनारायण कथा आहे त्या प्रत्यक्ष स्कंद

---

४. तरंति येन तत्र वा तत् तीर्थम् ।

५. सत्यं तीर्थं क्षमा तीर्थं तीर्थमिन्द्रियनिग्रहः ।
सर्वभूतदया तीर्थं तीर्थमार्जमेव च ।।
दानं तीर्थं दमस्तीर्थं सन्तोषस्तीर्थमुच्यते ।
तसेच एका हिंदी कवीनेही म्हटले आहे
मन मथुरा, दिल द्वारका, काया काशी ज्ञान ।
दस द्वारे का देहरा तां में जोत पहचान ।।

६. व्रतामति-कर्म नाम निवृत्ति कर्म वारयतीति सतः ।
इदमपीतरद् व्रतमेतस्मादेव वृणोति सतः ।।
अर्थः– कुकर्मांपासून परावृत्त करते म्हणून याला 'व्रत' म्हणतात; मान्य किंवा ग्रहण केले जाते म्हणून 'व्रत' म्हणतात. तेव्हा वाईट सवय सोडणे आणि चांगली दृढतेने धारण करणे म्हणजे 'व्रत' होय.

पुराणातही असेच म्हटले आहे.[७] परंतु लोक अशा प्रकारचे वन, तीर्थ आणि व्रत यांकडे लक्ष देत नाहीत त्यामुळें ते नराचा नारायण बनण्याची सत्य कथा ऐकण्यास पात्र ठरत नाहीत तसेच कथेचे कथित फळही प्राप्त करू शकत नाहीत.

आता एका वृद्ध सामान्य ब्राह्मणाच्या शरीरात दिव्य प्रवेश करून सत्य स्वरूप शिव स्वरूप शिव परमात्म्याने आम्हास पुन्हा नराचा श्री नारायण बनण्याची सत्य कथा ऐकविल्यामुळे ते व्रत कोणते व ती सत्य कथा कोणती आहे हे आम्ही जाणले आहे.

व्रताचा अर्थ स्पष्ट करताना सांगितल्याप्रमाणे वास्तविक हे व्रत आहे ब्रह्मचर्य किंवा पूर्ण **पवित्रतेचे** व्रत. भगवान केवळ काही **तासापुरता उपवास करण्याची नव्हे** तर कलियुगाचा अंत आणि सत्ययुगाचा प्रारंभ यामधील जो **संगम समय** आहे, त्या अल्पशा काळात निर्विकारी पवित्र जीवन व्यतीत करण्याची आज्ञा देतो. आज लोक काम, क्रोध इत्यादी विकारांना जणू आत्म्याचा आहार मानून बसले आहेत (म्हणूनच ते या विकारांच्या अधीन होऊन वर्तन करतात आणि त्यांना स्वाभाविक मानतात.) **विकाररूपी आहार सोडणे हेच खरे सर्वोत्तम व्रत आहे असे सांगून भगवान निर्विकारी जीवन व्यतीत करण्याची आज्ञा देतो. खरे पाहता, तन, मन व धन याद्वारे कोणतेही वाईट कर्म न करणे हेच सर्वश्रेष्ठ व्रत आहे, ते केल्याने माणूस रंकाचा राव, रोग्याचा सदा निरोगी आणि सुखी**

---

७. ब्रह्मचर्यं परम तीर्थं तीर्थं च प्रियवादिता।
ज्ञानं तीर्थं घृति तीर्थं तपस्तीर्थमुदाहृतम्।
तीर्थानामपि तत्तीर्थं विशुद्धिर्मनसः परा।
न जलाप्लुत देहस्य स्नानमित्यभिधीयते
स स्नातो यो दमस्नातः शुचिः शुद्ध मनोमलः।।
(स्कंद, काशीखंड, ६-२६-३३)
लक्षात असू द्या की, ''ज्याने इंद्रिय-संयमरूपी स्नान केले आहे तोच खरा पवित्र होय'' असेही येथे म्हटले आहे.

संपत्तिवान होऊन मुक्तीला तसेच वैकुंठात देवपदाला प्राप्त होतो.

**कथेत ब्राह्मण, भिल्ल, वाणी इत्यादींचा उल्लेख का आहे?**

**हे व्रत भिल्ल, व्यापारी, ब्राह्मण, राजा, स्त्री-पुरुष सर्वजण करू शकतात आणि या जगात सुखोपभोग घेत भविष्यातही वैकुंठचे सुख प्राप्त करू शकतात.** कथाकाराने हे उद्दिष्ट स्पष्ट करण्यासाठी कलावती व लीलावती, साधुवाणी व त्याचा जावई, राजा, भिकारी, ब्राह्मण, भिल्ल इत्यादींच्या कथा तयार करून त्यात अशक्य गोष्टी घुसडल्या आहेत. त्याने भगवानाचा (शिव) स्पष्ट परिचयही लिहिला नाही आणि ज्या वृद्ध ब्राह्मणाच्या शरीरात भगवानाने परकाया प्रवेश करून त्याला 'ब्रह्मा' हे नाव दिले, त्याचाही परिचय करून दिला नाही. अशा रीतीने सारे उद्दिष्ट अस्पष्ट, अनिश्चित व अशक्यप्राय वाटते. त्यामुळे सर्व मामला बिघडून गेला आहे.

**कोणती नौका कशात बुडते आणि कोणती नौका तरंगते?**

तसेच, भगवान म्हणतो की, ''जे स्त्री-पुरुष निर्विकारी जीवन व्यतीत करण्याचे व्रत करतील ते धनधान्याने संपन्न होतील आणि त्यांची **जीवनरूपी नौका** भवसागर **तरून जाईल** आणि जे हे व्रत करणार नाहीत त्यांची **जीवनरूपी नौका शोकसागरात बुडून जाईल.**''परंतु कथाकाराने स्थूल नौका बुडण्याची व तरंगण्याची गोष्ट लिहिली आहे.

**सोने-चांदी व रत्ने-मोती पालापाचोळा बनण्याचा भावार्थ**

या व्यतिरिक्त, भगवान म्हणतो की, ''तन, मन, धन सर्वकाही मला अर्पण करून स्वतःला विश्वस्त (Trustee) अर्थात् निमित्त मानून वागा म्हणजे मग आपली आसक्ती संपेल आणि आपले कल्याण होईल. आता जे लोक ब्राह्मण-श्रेष्ठ ब्रह्माच्या मानवी शरीरात प्रविष्ट झालेल्या भगवानाच्या या महावाक्यांचा असा अर्थ लावतात की, कदाचित भगवानाला त्यांच्याकडून काही घेण्याची इच्छा आहे

ते भगवानापासून आपले धनधान्य वगैरे लपवितात. ते हे समजत नाहीत की, भगवान धनधान्य वगैरेंचा दाता आहे, तो आमचे घेऊन काय करील ? तेव्हा अशाप्रकारे जे भगवानाला समर्पण न होता त्याला याचक समजतात. त्यांचे या जगात कल्याण होत नाही. कारण **त्यांचा मोह, ममत्व इत्यादी सुटलेले नसतात.** आता त्यांच्या अकल्याणाची गोष्ट कथाकाराने अशारीतीने लिहिली आहे की, भगवानाच्या अवकृपेने 'त्यांच्या सर्व धनधान्याचे रूपांतर पालापाचोळ्यात होते' आणि व्रत करताच त्याच्या कृपेने 'पालापाचोळ्याचे पुन्हा धनधान्य बनते.' कथाकराच्या अशा तऱ्हेच्या लिखाणाला अशक्यतेचा भडक रंग चढलेला दिसतो, कारण वस्तुतः सोन्याचांदीचे रूपांतर कधी पालापोचोळ्यात होणे शक्य नाही. तेव्हा, वास्तविक भाव अशा अविश्वसनीय शब्दात व्यक्त केल्याने सारे काही बिघडून गेले आहे.

पुनरावृत्ती टाळून थोडक्यात आम्ही हेच सांगू इच्छितो की, सत्य स्वरूप भगवान शिव नराला श्री नारायण बनविण्यासाठी अथवा मुक्ती व जीवन्मुक्तीसाठी लायक बनविण्यासाठी **पवित्रता किंवा ब्रह्मचर्यरूपी व्रत सांगून श्री नारायणरूपी लक्ष्याची स्मृती दृढ ठेवण्याची तसेच समर्पित जीवन व्यतीत करण्याची आज्ञा देतो. जो या पवित्रता रूपी व्रताचे पालन करतो तो तरतो आणि धनसंपत्तीचा मालक बनतो व जो करीत नाही त्याची जीवन-नौका बुडते.** आता प्रथम आम्ही सत्य स्वरूप परमात्म्याचा यथार्थ परिचय करून देणार आहोत. त्यानंतर सत्य नारायणाची सत्य कथा सांगणार आहोत.

### सत्य अर्थात परमपिता परमात्म्याचा यथार्थ परिचय

परमपिता परमात्मा निराकार म्हणजे ज्योतिर्बिंदू स्वरूप असून ज्ञानाचा सागर, शांतीचा सागर, आनंदाचा सागर, प्रेमाचा सागर, पतितपावन आणि मुक्ती-जीवनमुक्तीचा दाता आहे. कल्याणकारी

असल्याने त्याचे दिव्य अथवा कर्तव्यवाचक नाव **'शिव'** आहे. भारतातील लोक 'शिवलिंग' नामक प्रतिमा तयार करून आजतागायत त्याची पूजा करीत आलेले आहेत. परंतु पूजा करणाऱ्या भक्तांना शिव परमात्म्याचा यथासत्य परिचय नाही. जरी चिरकालापासून सर्वशक्तिमान व सद्गतिदाता शिव परमात्म्याची साऱ्या जगात याच शिवलिंगाच्या रूपाने भिन्न भिन्न नावांनी निरनिराळ्या देशांत व धर्मांत पूजा वा उपासना चालत आलेली असली तरी लोकांना त्याचे यथार्थ ज्ञान नाही. भारतातील 'गोपेश्वरम्' व 'रामेश्वरम्' या मंदिरावरून हे स्पष्ट होते की, शिव परमात्मा श्रीकृष्ण तसेच श्री रामालाही पूज्य आहे. उज्जैन किंवा सोमनाथ येथे विक्रमादित्याने आणि मक्केत महंमदाने याची स्थापना याच रूपात केली. यावरून इस्लाम धर्मात 'संग-ए-असवद' नावाचा जो पवित्र पाषाण आहे तो वास्तविक शिवलिंगाचेच एक रूप आहे. येशू ख्रिस्त, झरतुष्ट, गुरू नानक इत्यादी धर्मसंस्थापकांनीही परमात्म्याला ज्योतिस्वरूपच मानले आहे.

परमात्म्याची जितकी म्हणून नावे आहेत ती सर्व त्याच्या कर्तव्यांशी संबंधित आहेत. उदाहरणार्थ, परमात्मा सर्व जगाचे व सर्व आत्म्यांचे कल्याण करतो म्हणून त्याचे आपण **'शिव'** या नावाने स्मरण करतो. परमात्मा आत्म्यांच्या ८४ जन्मांची कहाणी आणि या सृष्टीच्या आदी-मध्य-अंताचे रहस्य सांगतो म्हणजे 'अमर कथा' सांगणारा म्हणून त्याला **'अमरनाथ'** म्हणतात. ज्ञानरूपी सोमरस पाजणारा म्हणून त्याला **'सोमनाथ'** म्हणून स्मरण्यात येते. तसेच मनुष्य-सृष्टीचा निर्माता असल्याने त्याचे एक नाव **'विश्वेश्वरनाथ'** असे असून काळाचाही काळ म्हणून त्याला **'महाकालेश्वर'** असे संबोधिले जाते. आम्हा सर्व आत्म्यांचा पिता असल्यामुळे त्याला **'परमपिता परमात्मा'** God The Father या नावाने पुकारण्यात येते. त्याचप्रमाणे तो सर्वश्रेष्ठ असल्याकारणाने त्याला **'अल्लाह'**


परमात्म्याचा परिचय
सर्व आत्म्यांचा पिता
GOD IS LIGHT
एक निरंकार
शिव
विश्वनाथ
VISHWANATH
जपान मध्ये
IN JAPAN
संग-ए-असवद
SANG-E-ASWAD
रामेश्वर
RAMESHWARAM
सोमनाथ
SOMNATH

असेही म्हणतात. शिव परमात्मा अमरकथा ऐकविण्यासाठी आणि पतीत भ्रष्टाचारी जगाला पावन व श्रेष्ठाचारी बनविण्यासाठी एका वृद्ध, अनुभवी माणसाच्या शरीराचा आधार घेऊन त्याच्या मुखाद्वारे साऱ्या शास्त्रांचे सार ऐकवितो. ज्याला आपण '**भगवानाचे गीत**' अथवा '**भगवद्‌गीता**' असेही म्हणतो. परमात्मा त्या माणसाचे नाव '**प्रजापिता ब्रह्मा**' असे ठेवतो. **परमपिता शिव परमात्मा आणि प्रजापिता ब्रह्मा या उभयतांचा दिव्य जन्म भारतातच होतो** म्हणून भारतातच शिव परमात्म्याचे स्तवन व पूजन सर्वात अधिक होते आणि भारताचाच साऱ्या जगात उदो उदो होतो. प्रजापिता ब्रह्माद्वारे जी 'अमर कथा' वा 'सत्यनारायण कथा' परमपिता शिव परमात्मा ऐकवितो ती तो सांप्रत पुन्हा ऐकवित आहे. आता आम्ही ती सांगणार आहोत.

# सत्यनारायणाची सत्यकथा

**प**रमपिता शिव परमात्म्याने जी सत्यनारायणाची कथा सांगितली आहे ती थोडक्यात अशी आहे –

''पाच हजार वर्षापूर्वी सृष्टीवर सूर्यवंशी सर्वगुणसंपन्न, सोळा कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी. मर्यादा पुरुषोत्तम व संपूर्ण अहिंसक श्री लक्ष्मी व श्री नारायण यांचे अखंड चक्रवर्ती राज्य होते त्या वेळी सृष्टीवर संपूर्ण सुख व शांती होती. दुधातुपाच्या नद्या वाहत होत्या. रत्नजडित सुवर्ण महाल होते. प्रकृती माणसाची दासी होती. तेव्हा शरीर सुवर्णतुल्य कांतीचे व निरोगी असे. सर्वत्र आनंदी आनंद व मंगल वातावरण पसरलेले होते. अशांती व दुःख यांचे लवमात्रही ज्ञान कोणाला नव्हते. कधीही कोणाचा अकाली मृत्यू होत नव्हता. आपल्या इच्छेनुसार सर्व प्राणिमात्र आपले जीर्ण झालेले शरीररूपी वस्त्र बदलीत असत. त्या वेळेस काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, आळस इत्यादींचा लवलेशही नव्हता. सर्व लोक जन्मतःच महात्मा असत. हा देश देवस्थान होता. सर्व निर्विकारी आणि संपूर्ण पवित्र आत्मे होते. ते लक्ष्मी व श्री नारायण यांच्या राज्यातील सुख व शांती उपभोगण्यासाठी परमधामाहून म्हणजे मुक्तीच्या अवस्थेतून या सृष्टीवर आपापल्या योग्यतेनुसार आपापल्या वेळी येऊन साकार (सदेह) झाले होते. सृष्टीवरील त्या पवित्र आत्म्यांच्या सुखशांति-संपन्न अवस्थेला **'सत्वप्रधान अवस्था'** अथवा **'जीवनमुक्ती'** असे म्हटले जाते. तेव्हा जन्मही योगबलाने व विनायातना होत असे. त्या वेळी सृष्टीवर केवळ एकच सत्य धर्म होता ज्याला 'देवी-देवता धर्म' असे म्हणतात. एकच 'देव भाषा' बोलली जात असे. त्या काळी प्रत्येक वस्तूत सत्व होते. राजा व प्रजा उभयता परिपूर्ण सुखशांती व प्रेमाने जीवन व्यतीत करीत होते. जणू सर्व जण प्रभामंडळ व सुवर्ण किरीट या दोन मुकुटांनी युक्त होते. सर्वांना सर्व काही प्राप्त होते.

होते. त्यामुळे तेथे 'इच्छा' वा 'तृष्णा' नावालाही नव्हती. देवतांच्या भांडारात कोणत्याही वस्तूची कमतरता नव्हती असे जे म्हणतात ते काही खोटे नाही. पृथ्वी, आप, तेज, वायू, जीव, जंतू कोणीही त्रास देत नव्हते. त्या काळी कोणीही दैत्य, राक्षस वा असूर नव्हता. सर्व लोक एक 'देवता' वर्णाचेच होते.

तेव्हा कोणतेही पूजास्थान किंवा प्रार्थनास्थळ नव्हते. शास्त्रे, पुराणे वा धर्मग्रंथ इत्यादीही नव्हते. सर्वच पूज्य साक्षात देवी वा देवता होते. युद्धे, लढाया वगैरे मुळीच होत नव्हत्या. त्यामुळे सैन्य, दारूगोळा, अस्त्रशस्त्रेही अस्तित्वात नव्हती. रोगराई, औषधालये, दवाखाने, रुग्णालये वगैरेही नव्हती कारण लोकांच्या जीवनात तणाव नव्हता, प्रदूषणे नव्हती, खाद्य पदार्थांत भेसळ होत नव्हती, लोकही आरोग्याच्या नियमांचे उल्लंघन करीत नव्हते. ते दीर्घायुषी होते. त्यांचे सरासरी आयुष्यमान १५० वर्षांचे होते. तंटेबखेडे नव्हते. त्यामुळे खटले, न्यायालये असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. कोणीही गरीब वा कंगाल किंवा भ्रष्टाचारी नव्हता. संप, टाळेबंदी, दंगेधोपे इत्यादी कोणताही प्रकार घडत नव्हता. त्यामुळे पोलीसही नव्हते. कारण सर्व लोक श्रेष्ठाचारी होते. महाराणी (श्री लक्ष्मी) आणि महाराजा (श्री नारायण) प्रजेचे जणू मातापिताच होते. त्यामुळे राज्यकारभार दंडभयावर नव्हे तर प्रेमावर आधारित होता. त्या काळी गाय व वाघ, एकाच घाटावर पाणी पीत असत अशी एक म्हण आहे. तेथील देवी-देवतांच्या पवित्र आचरणामुळे त्यांना 'कमलहस्त', 'कमलनयन', 'कमलमुख' इत्यादी विशेषणे लावली जातात. जीवनात कधीही रोग, शोक, दु:ख वा संकटे यांना तोंड द्यावे लागत नसल्याने तसेच अखंड पवित्रता असल्याने त्यांच्या मुखमंडलावर एक सात्विक तेज विलसत असे आणि त्यांच्या व्यक्तित्वात एक आगळेच आकर्षण व प्रभुत्व होते आणि त्यापासून शीतलता व दिव्यतेच्या लहरी विकीर्ण होत असत. ते अशा गोड व शांत स्वभावाचे होते की, आज लोक

त्यांच्या मूर्तीपुढे बसून त्या मूर्तीपासूनही शांतीचा अनुभव घेतात तसेच त्यांच्याकडे धनधान्याची याचना करतात.

सत्ययुगी देवी-देवतांना 'सूर्यवंशी' म्हणतात कारण त्यांच्यातील आत्मिक तेज पूर्ण कलांना प्राप्त झालेले होते. म्हणजे त्यांची पवित्रता संपूर्ण १६ कला होती. तेव्हा अस्पृश्यता नव्हती. वर्णभेद, वर्गभेद, भाषाभेद असला कोणताही कृत्रिम भेद त्या काळी अस्तित्वात नव्हता. सर्वजण स्वधर्मात (आत्मिक स्वरूपात) स्वाभाविकरीत्या स्थित राहून वागत असत.आपल्या या वैशिष्ट्यांमुळे सत्ययुगाचे आजतागायत गुणगान होत आलेले आहे. श्री लक्ष्मी व श्री नारायण यांचे ते राज्य संपूर्ण आठ पिढ्या चालले. त्या युगाचा कालखंड १२५० वर्षे होता. त्याला 'सत्ययुग' असे म्हणतात. ती सृष्टी म्हणजे जणू फुलांचा एक विराट बगीचा होता किंवा स्वर्ग होता. वैकुंठ होता.

ज्या प्रमाणे एखादी नवीन इमारत कालांतराने आपोआप जुनी होते त्याचप्रमाणे ती सुखशांतीसंपन्न सृष्टी हळूहळू जुनी व्हावयास प्रारंभ झाला आणि पवित्रतेच्या सोळा कलांपैकी दोन कला कमी झाल्या. तेव्हापासून मग त्रेतायुग आणि श्रीसीता व श्रीराम यांचे राज्य सुरू झाले. 'यथा राजा तथा प्रजा' या म्हणीनुसार त्या काळीही सृष्टीवर सर्व सुख व पूर्ण शांतीचे स्वराज्य होते. त्या राज्याचे सुखस्वप्न भारतातील लोक आजही पाहत असतात. महात्मा गांधीही त्याच रामराज्याचे स्वप्न साकार करण्याची कामना बाळगून होते. रामराज्यातही लोकांना आपल्या जीवन-निर्वाहासाठी अथवा अर्थार्जनासाठी विशेष परिश्रम करावे लागत नसत. त्यावेळीही जमीन अत्यंत सुपीक होती. राज्यविस्तार करण्याकरिता एकमेकांवर आक्रमणे होत नव्हती. अकाली मृत्यूही होत नव्हता. मातापित्यांच्या हयातीत त्यांच्या मुलांना काळ हिरावून नेत नसे.

तेव्हा पवित्रता-सुख-शांतीदृष्टया सर्व स्त्री-पुरूष चौदा कला संपूर्ण होते. ज्याप्रमाणे पौर्णिमेच्या एक दिवस आधी चंद्र १४ कलांचा असतो, त्याचप्रमाणे त्रेता युगात सर्व आत्मे चौदा कला प्रकाशमान होते. त्यामुळे सर्व लोक निरोगी होते आणि स्वभावाने धर्मनिष्ठ होते. त्यांच्या कर्मांवर धर्माचा अंकूश होता.

यावरून स्पष्ट होते की, रामराज्यात 'रावण' नावाचा असूर वा राक्षस नव्हता. काय प्राज्ञा होती कोणाची सीतेकडे वाईट दृष्टीने बघण्याची, मग तिला पळवून नेण्याची गोष्टच सोडा. खरे पाहता, राम व रावण यांची कथा एका दुसऱ्याच युगाशी संबंधित आहे. त्रेता युगी खरा राजा श्रीराम हा तर जीवन्मुक्त व पावन होता. त्याच्या आयुष्यात त्याला शारीरिक, मानसिक किंवा अन्य कोणत्याही प्रकाराचे दु:ख नव्हते. संतकवी तुलसीदास म्हणतो,

दैहिक दैविक भौतिक तापा
राम राज न काहू व्यापा

तसेच त्रेता युगात श्रवणकुमाराच्या मातापित्यांप्रमाणे ना कोणी आंधळे होत असत ना कोणी कोणाला शाप देत असे, ना कोणी मंथरेसारख्या बायका होत्या, कैकयीप्रमाणे ना कोणी सावत्र माताही असावयाची. कोणीही एकाहून अधिक विवाह करीत नसे. तेव्हा कोणीही जराजर्जर होत नसे ना कोणी कोणाच्या वियोगाने मरत असे. सर्व मोहजीत होते. रामराज्यात आणि त्याच्या पूर्वीही 'यथा राजा तथा प्रजा' या म्हणीनुसार सर्व लोक धर्मनिष्ठ व श्रेष्ठ आचरण करणारे होते. तेव्हा ना कोणी धोबी होता ना कोणी कोणाची निंदा करीत होता. म्हणूनच तर 'रामराज्य' असावे असे सर्वांना वाटते. म्हटलेच आहे

राम राजा राम प्रजा राम साहूकार है।
बसे नगरी जीये दाता धर्म का उद्धार है।

कोणाची काय प्राज्ञा होती रामाची राणी, पवित्र सीतेचे अपहरण करण्याची? सोन्याचे हरण कधी असू शकेल काय? दहा

तोंडांचा कोणी माणूस असणे शक्य आहे काय ? जमिनीत गाडलेल्या घडयापासून कोणाचा जन्म होऊ शकेल काय ?

खरे पाहता, रामकथा रामेश्वराशी (शिव परमात्मा) संबंधित आहे. परमपिता परमात्म्याला **'रमणीय'** (म्हणजे मनाला रमविणारा) असल्याने **'राम'** असेही म्हणतात. 'रावण' या शब्दाचा अर्थ रामाच्या अगदी विरुद्ध आहे. रडावयास लावणाऱ्याला म्हणजे दुःख देणाऱ्यालाच 'रावण' असे म्हणतात. पाच मनोविकारच मनुष्यात्म्याच्या रडण्याचे अर्थात दुःखाचे व अशांतीचे कारण आहे. म्हणून या पाच मनोविकारांचे सामूहिक नावच रावण आहे. रावणाची दहा तोंडे ही स्त्री व पुरुष यांच्यात पाच-पाच विकार असल्याचे सूचवितात. तेव्हा, सांगावयाचे म्हणजे 'रामकथा' त्या काळाशी संबंधित आहे जेव्हा समाजातील प्रत्येक स्त्री व पुरुष पाच-पाच विकारांनी ग्रासलेले होते. वास्तविक हे सारे जगच मुळी एक मोठे द्वीप आहे कारण याच्या चौफेर समुद्र आहे. म्हणून हेच **'लंका'** होय; अन्यथा ज्यांला आज आपण **'लंका'** म्हणतो त्याच्या इतिहासात तर दहा तोंडांचा कोणताही असूर राजा होऊन गेलेला नाही. या गोष्टीचा पडताळा प्रत्यक्ष त्या देशातील लोकांना विचारून पाहता येणे शक्य आहे. आध्यात्मिक दृष्टचा प्रत्येक आत्माच 'सीता' आहे, तो अयोनिज आहे, आत्म्याचा पती परमात्माच 'राम' आहे. जेव्हा मनुष्यात्मा मनाची लक्ष्यरूपी रेषा (लक्ष्मण रेषा) ओलांडतो तेव्हा पाच विकार रूपी 'रावण' त्याचे अपहरण करून त्याला बंदीत ठेवतो. नंतर परमात्मा राम त्याला सोडवितो म्हणजेच मुक्ती देतो. हा सारा वृत्तांत कलियुगाच्या अंती घडतो. त्रेता युगी रामाच्या वेळेस ना कुंभकर्ण असतो, ना मेघनाद व ना रावण.

त्या युगात श्रीरामाच्या बारा पिढयांनी राज्य केले. त्या युगाचा कालखंडही १२५० वर्षे होता. त्या काळातही **सत्वगुण** स्वभावाचे आत्मे या सृष्टीवर साकार (देहधारी) झाले. तेव्हाही एकच आदी

सनातन देवी-देवता धर्म अथवा आर्य धर्म अस्तित्वात होता. सत्य व त्रेता या दोन युगातील आत्म्यांपैकी श्रीलक्ष्मी व श्रीनारायण हे अति प्रसिद्ध देवी-देवता होऊन गेल्या. तसेच श्रीसीता व श्रीराम हे आत्मेही श्रेष्ठ व मर्यादा पुरुषोत्तम म्हणून मानले जातात.

त्रेता युगाच्या अंती सृष्टी अधीकच जीर्ण झाली आणि त्या वेळी पवित्रता व सुखशांतीच्या सहा कला आणखी कमी झाल्या. तेव्हा मग देवी-देवता वाममार्गास लागल्या अर्थात पतित झाल्या. सत्य व त्रेता या दोन युगांना 'ब्रह्माचा दिवस म्हणतात.' द्वापर युगाच्या सुरुवातीपासून मायेचे (पाच मनोविकार)म्हणजे आत्म्यांचा सर्वात पुरातन शत्रु 'रावण' याचे राज्य सुरू झाले. त्याचबरोबर दुःख व अशांतीसही प्रारंभ झाला व सत्वसामान्य मनुष्यात्म्याचे रजःप्रधान अवस्थेत येणेही सुरू झाले. मनुष्यात्मे हळुहळू पाच विकारांच्या जाळ्यात गुरुफटत चालले आणि त्याच वेळेस इतर धर्मसंस्थापकांनी आपआपले धर्मस्थापन करण्यास आरंभ केला. तेव्हा देवी-देवता-धर्म मनोविकारांनी ग्रासलेला होता. इतर धर्मांतील सर्वात पहिला धर्म जो यहुदी तो अब्राहामाने स्थापन केला. याच द्वापर युगापासूनच भक्तिमार्गास सुरुवात झाली आणि वेद, उपनिषदे, शास्त्रे, पुराणे इत्यादी लिहिण्यात आली तसेच शिवलिंगाची मूर्तीच्या रूपाने पूजा व्हावयास आरंभ झाला.

याच कालखंडात ऋषि-मुनी होऊन गेले आणि त्यांनी धार्मिक ग्रंथ लिहिले. त्या वेळेस भक्ती सत्वप्रधान अवस्थेत होती. त्यामुळे फक्त निराकार परमपिता शिव परमात्म्याचीच पूजा होत असे. पण हळुहळू भक्तीसुद्धा सत्वप्रधान अवस्थेपासून ढळून रजःप्रधान अवस्थेला प्राप्त झाली आणि इतर धर्माच्या संस्थापकांचे आत्मे सृष्टिमंचावर यावयास प्रारंभ झाला. तेव्हा श्रीविष्णू, श्रीलक्ष्मी, श्रीनारायण, महादेव शंकर, श्रीकृष्ण, श्रीराम इत्यादींची क्रमाक्रमाने पूजा व्हावयास सुरुवात झाली. यज्ञ, जप, तप, दान, पुण्य, व्रत,

तीर्थयात्रा, पूजापाठ, कर्मकांड इत्यादी प्रकारांनाही आरंभ होत गेला. लोकांना धर्माबद्दल फारच अगत्य व श्रद्धा वाटत होती, ते यमनियम पाळण्यासाठी फार कठोर व्रत घेत असत. ऋषि-मुनी जंगलात वा अरण्यांत राहून वेद-शास्त्रे लिहीत व शिकवीत असत.राजे लोकही धर्माचार्यांना फार मान देत असत. याच कालखंडात वर्ण-व्यवस्था अस्तित्वात आली आणि जातीपाती निर्माण होऊन भेदभावास प्रारंभ झाला. हळुहळू अनेक धार्मिक पंथोपपंथ व संप्रदाय उदयास येऊ लागले आणि लोकांत मतभेद सुरु होऊन ते उग्र-रूप धारण करू लागले. देश अनेक राज्यांत विभागण्यात येऊ लागला. कालांतराने इंद्रिय-संयमन सुटू लागले. रोग, शोक, जरा, मृत्यू, दुःख, अशांती इत्यादी आपला मुक्काम ठोकावयास लागले.

अब्राहामाने यहुदी धर्म स्थापन केल्यानंतर सुमारे २५० वर्षांनी गौतम बुद्धाने बुद्धधर्म स्थापन केला. त्याच्या सुमारे २५० वर्षांनंतर येशू ख्रिस्ताने ख्रिश्चन धर्म स्थापिला. त्यानंतर सुमारे ५०० वर्षांनी शंकराचार्यांनी संन्यास संप्रदायाची स्थापना केली. या घटनेनंतर सुमारे १०० वर्षांनी महंमदाने मुस्लीम धर्म स्थापन केला. अशा रीतीने अनेक धर्मसंस्थापकांनी अनेक धर्म स्थापन केले. आता देवी-देवतांबरोबर अनेक धर्मसंस्थापकांचीही पूजा व्हावयास सुरुवात झाली. या धर्मसंस्थापकांना दुसऱ्या शब्दांत 'पैगंबर' (ईश्वराचा प्रेषित) असेही म्हणतात. हे धर्मसंस्थापक आपापल्या परीने परमात्म्याचा परिचय करून देतात पण कोणीही गती व सद्गतीचा मार्ग दाखवू शकत नाही कारण गती-सद्गतीदाता एक परमात्माच आहे. म्हणून इतक्या सर्वधर्मसंस्थापकांच्या आगमना-नंतरही सृष्टीचे अधःपतनच होत गेले आणि द्वापर युगाच्या अंती भक्तीच्या रजोगुणी अवस्थेचा अधःपात होऊन ती तमोगुणी अवस्थेला येऊन पोहोचली. तेव्हा पवित्रतेच्या कलाही अती क्षीण झाल्या. द्वापर युगाचा कालखंडही १२५० वर्षेच असतो.

द्वापर युगाचा अंत आणि कलियुगाचा प्रारंभ या काळात देवी-देवतांव्यतिरिक्त प्रकृतीच्या विभिन्न तत्वांचीही (पंचमहाभूत) पूजा व्हावयास सुरुवात होते व भ्रष्टाचार, पापाचार तसेच अज्ञान-अंधकार वाढतच जातो. त्या वेळेस अनेक समाज निर्माण होतात आणि ते एकमेकांच्या धर्मावर आक्रमणेही करतात. तसेच धर्माच्या नावावर पापकृत्येही करतात. लोक परमपिता परमात्म्याची इतकी ग्लानी करू लागतात की, कुत्री-मांजरी, पाणी, माती, झाडे, दगड इत्यादी सर्व चराचर वस्तूत परमात्मा आहे असे म्हणण्यापर्यंत त्यांची मजल जाते. एवढेच नव्हे तर स्वतःलाच भगवान व 'शिवोहम्' म्हणवून ते त्याच्या पासून पार विमुख होतात.

या युगात काम-क्रोधादी विकारांच्या अधिकाधिक अधीन होत गेल्याने लोकांत अनेक दुर्गुणांची वाढ होत गेली त्यामुळे तंटेबखेडे फार होऊ लागले. राजे लोक एकमेकांवर आक्रमणे करून राज्ये गिळंकृत करू लागले. वस्तुंच्या किंमती हळुहळू वाढू लागल्या. लोकांमधील स्नेहाची जागा मोहाने घेण्यास प्रारंभ झाला. नियम सैल व्हावयास लागले. राजेरजवाडे ऐशारामात व ख्यालीखुशालीत राहू लागले आणि त्यांच्या आचरणास वासना तसेच मनोविकार पोखरू लागले. त्यामुळे हळुहळू लोक राजसत्तेविरुद्ध होत गेले. लोकांमधील आचरणाची श्रेष्ठता संपुष्टात येऊ लागली आणि त्या जागी कर्मकांड व ब्राह्मणाद्वारे पूजन इत्यादी विधी अधिक प्रचलित होत गेले. रीतिरिवाज किचकट व खर्चिक होत चालले; कालांतराने लोक धर्माचार्यांनाही कंटाळू लागले. अशा रीतीने धर्मसत्ता व राज्यासत्ता एकमेकांपासून दूरावत गेल्या आणि समाजावरील त्यांचा नैतिक प्रभाव कमी होत गेला.

कलियुग हे लाडीलबाडीचे व तमोगुणी युग आहे. जसजसा काळ लोटत जातो तसतसे लोक अधिकाधिक पतित होत जातात. ते खऱ्या मनाने व अनन्य भावे आपल्या इष्ट दैवताची भक्ती करीत

नाहीत. माणसाचा स्वभाव चंचल होतो. आश्रम व्यवस्थाही छिन्नभिन्न होते आणि केवळ विकारी गृहस्थाश्रमच तेवढा शिल्लक उरतो कारण लोक 'ब्रह्मचर्याश्रम' योग्य रीत्या निभावत नाहीत; त्यांची दृष्टी, वृत्ती व कृती दूषित होते. ते आरती करताना देवास आळवितात की त्यांचे विषय-विकार नाहीसे कर परंतु ते स्वतः होऊन विषय-विकार सोडण्याचा काहीच प्रयत्न करीत नाहीत तसेच मनातून वासना इत्यादी काढून टाकण्याची खरी कामनाच करीत नाहीत, उलट वासनामय विकारी जीवनालाच ते स्वाभाविक मानू लागतात. काम, क्रोधादी विकारांना 'नरकाचे द्वार' मानत असूनही ते रोज त्यातून ये-जा करीत राहतात. साधुवेषालाही बदनाम करणारे साधूही बरेच होतात. भक्ती व पूजेच्या नावाखाली बहुतेक ब्राह्मण, बडवे, पुजारी इत्यादी लोक धनार्जनाच्या लोभात पडतात. त्यामुळे लोक त्यांचे चारित्र्य व आध्यात्मिक स्थिती यांपासून प्रेरणा घेऊ शकत नाहीत.

राजकारणात साम-दाम-दंड-भेद यांचा सर्रास वापर व्हावयास लागतो. युद्धाचे सारे नीति नियम झुगारले जातात. राजेरजवाडे आपल्या भोगविलासासाठी जनतेचे रक्तशोषण करू लागतात आणि आयाबहिणींवर कुदृष्टी ठेवतात; तसेच सैन्यबळ व सत्ता यांच्या नशेत धुंद राहून मदिरा व मदिराक्षीच्या दलदलीत रुतून पडतात.

जसजशी कलियुगाची पावले पुढे पडत जातात तसतसे लोकांत धार्मिक संकुचितपणा, वाद-विवाद, तंटेबखेडे, नास्तिकपणा इत्यादी वाढत जातात. ते अधिकाधिक देहनिष्ठ होत जातात. त्यांच्या जीवनात दु:ख व. अशांती यांची वाढ व्हावयास लागते आणि कलियुगाची अंतिम घटका येताच अत्याचार, अनाचार, पापाचार, भ्रष्टाचार व विकार लोकांना त्राहि त्राहि करावयास लावतात.

कलियुगाच्या या अंतिम समयी अशी परिस्थिती ओढवते की, मुलगी आपल्या तोंडाने वराची मागणी करू लागते, आकाशातून

अग्निवर्षाव करणारे बॉम्बगोळे तयार करण्यात येतात सर्व वर्ण एका प्रकारे शूद्र वर्णाचे होतात कारण ते आसुरी वृत्तीचे व विकारी बनतात, धान्ये पुडच्यांमधून व दूध बाटल्यांतून विकण्यात येते, लोकसंख्या इतकी भरमसाठ वाढते की प्रत्येक ठिकाणी गर्दी जमलेली दिसते, गाय घाणीत तोंड घालू लागते, स्त्री-पुरुषात रोगराई वाढते आणि त्यांचे आयुष्यमान कमी होते. **सध्या जो काळ चालू आहे तो असाच समय आहे ती कलियुगाची अंतिम घटका आहे.**

अशा रीतीने ही कथा दर ५,००० वर्षांनी पुन्हा पुनरावृत्त होते. सध्या खरोखरच तीच कलियुगाची अंतिम घटका चालू आहे. जेव्हा अशी वेळ येते तेव्हा कर्मसंन्यासी लोक अल्पज्ञ असूनही 'श्री श्री १०८ जगद्गुरू' ही ईश्वरी उपाधी आपल्या नावापुढे लावावयास लागतात. या वेळी 'रावण' म्हणजे 'माया' (मनोविकार) हिचा संपूर्ण प्रभाव किंवा राज्य साऱ्या जगावर असते. मनुष्यात्मा मनोविकारांच्या जाळयात वाईट रीत्या अडकून पडलेला असतो. भाऊ आपल्या भावाचा खून करतो. आयाबहिणींची अब्रू लुटली जाते. अबलांवर अत्याचार केले जातात. भ्रष्टाचार वाढतो. चोऱ्यामाऱ्या होतात. अकाली मृत्यू होतात. दुष्काळ पडतो. उपासमार पसरते. भूकंप व वादळे होतात. पावसाची अतिवृष्टि होते. अनेक प्रकारचे रोग होतात. सर्वत्र अशांतीचे किंवा अधर्माचे राज्य पसरते. अशा वेळी सर्व मनुष्यात्मे दुःखात पार बुडून गेलेले असतात आणि आपापल्या समजुतीप्रमाणे परमपिता परमात्म्याला आळवतात. आपल्या मुलांची आर्त स्वराने मारलेली हाक ऐकून परमपिता शिव परमात्मा गीतेत दिलेल्या आपल्या वचनानुसार त्या कलियुगी आसुरी संपदासंपन्न सृष्टीवर दिव्य रीतीने अवतरित होतो.

परमपिता शिव परमात्मा अजन्मा, अभोक्ता व सर्व आत्म्यांचा मातापिता असल्यामुळे या सृष्टीवर त्याचा जन्म मनुष्य किंवा देवतांप्रमाणे मातेच्या गर्भापासून होत नाही तर तो एका **सामान्य, वृद्ध**

**व अनुभवी माणसाच्या शरीरात प्रवेश करतो हाच तो त्याचा 'दिव्य जन्म' होय.** परकाया प्रवेश केलेल्या त्या वृद्ध माणसाचे नाव परमात्मा **'प्रजापिता ब्रह्मा'** असे ठेवतो. **हा प्रजापिता ब्रह्माच तो वृद्ध ब्राह्मण होय ज्याला परमात्मा प्रथम सत्यनारायणाची सत्य कथा सांगतो आणि सत्यनाराण व्रत (संपूर्ण पवित्रचे व्रत) पाळण्याची आज्ञा करतो. पवित्रतारूपी सत्य व्रत पाळल्यानेच श्री नारायणपदानंतर ८३ जन्म घेऊन ८४ व्या जन्मात निर्धन भारतामध्ये एका ब्राह्मणाच्या रूपाने जन्म घेणारा हाच तो**




---

(चित्रात मनुष्यसृष्टीच्या या इतिहासचक्रात सत्ययुगाच्या आरंभापासून कलियुगाच्या अंतापर्यंतचा आणि 'संगम यगातील' परमात्म्याच्या अवतरणाचा वृत्तांत रेखाटलेला आहे.)

**ब्राह्मण होय ज्याचा आजच्या प्रचलित सत्यनारायण व्रत कथेत उल्लेख आहे. याच वृद्ध प्रजापिता ब्रह्मारूपी ब्राह्मणाच्या शरीरात परमात्मा अवतरित होत असल्याने स्तवनात म्हणण्यात येते की, : वृद्ध ब्राह्मण बनून सुवर्ण महाल उठविला' कारण त्याच साकार माध्यमाद्वारेच परमात्मा कंगाल भारताला सुवर्ण महालांचा, सत्ययुगी पावन भारत किंवा स्वर्ग करून सोडतो.** त्याच रूपाने भिल्लाप्रमाणे बहुतांशी निर्धन झालेल्या भारताला परमपिता शिव परमात्मा धनवान करतो. तसेच व्यापाऱ्यांचीही बुडालेली जीवननौका वर काढून पैलथडीला पोहोचवितो. सर्वांना तो ८४ जन्मांची ही आत्म्याची कथा तद्वत सत्य (परमात्मा) व श्री नारायण यांचीही कथा सांगून त्यांना पतिताचे पावन करतो आणि मुक्ती व जीवन्मुक्तीचा वारस बनवितो. परंतु श्री नारायणाच्या ८४ जन्मांच्या या सर्व कथेचे तसेच सत्यस्वरूप शिव परमात्म्याच्या जीवनकथेचे आणि पवित्रतारूपी खऱ्या व्रताचे ज्ञान प्रायःलोप पावल्याने आज केवळ 'व्रतकथा' अर्थात व्रताचीच महती तेवढी बाकी उरली आहे.

## ही कथा बहुतांशी लुप्त

'आज 'सत्यनारायणाची कथा' उपलब्ध नाही. आजतागायत कित्येकांनी सत्यनारायण कथा शोधून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण कोणीही त्यात यशस्वी होऊ शकलेला नाही.[१] काही लोकांचे असे मत आहे की, ज्या पुराणात पूर्वी ही व्रतकथा होती ते पुराणच आता सापडत नाही.[२] याचा अर्थ हाच होतो की,

---

१. गोरखपूर येथील गीता प्रेसने काही वर्षांपूर्वी स्कंद पुराणाचा जो हिंदी अनुवाद छापला होता, त्यात हे मान्य करण्यात आलेले आहे की, स्कंद पुराणाच्या मूळ पोथीत ही कथा सापडत नाही.

२. नवी दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'कादंबिनी 'या मासिक पत्रिकेच्या मे १९७० च्या अंकात (पृष्ठ १८-२२) 'सत्यनारायण कथा-एक शोध' या

'सत्यनारायणाची कथा' खरोखर प्रायः लुप्त झालेली आहे. अशा परिस्थितीत 'मुक्ती व वैकुंठाचे सुख देणारी' असे जिचे माहात्म्य वर्णिलेले आहे त्या कथेचे यथासत्य ज्ञान आता कोण देऊ शकेल ? हे निश्चित आहे की, जन्म-मरणाच्या फेऱ्यात सापडलेला कोणीही विस्मृतिशील माणूस या रहस्याचा उलगडा करणे शक्य नाही. परंतु नराला नारायण बनविणारा जो सत्यस्वरूप परमात्मा आहे, केवळ तोच याचे पुन्हा ज्ञान देऊ शकेल. तोच पुन्हा खरे व्रत पाळण्याची शिकवण देऊन माणसाला देवता किंवा नराला नारायण बनण्याचा पुरुषार्थ शिकवू शकेल. तेव्हा लक्षात असू द्या की, मागील पानांत सत्ययुगाच्या आरंभापासून कलियुगाच्या अंतापर्यंतची जी संक्षिप्त सृष्टिकथा दिलेली आहे ती आणि कलियुगाच्या अंती सत्यस्वरूप शिव परमात्म्याच्या पुनर् अवतरणाचा जो वृत्तांत सांगितलेला आहे तो प्रत्यक्ष भगवंतानी प्रजापिता ब्रह्माच्या मुखाद्वारे ऐकविलेल्या कथेवर आधारित आहे.

### या कथेद्वारे सर्व सुखांची प्राप्ती कशी होते!

आता प्रश्न उद्भवतो की, मागील पानात चतुर्युगांतील मनुष्यात्म्याच्या जन्म-पुनर्जन्माची तसेच परमपिता परमात्म्याच्या अवतरणाची जी कथा सांगितली आहे तिच्यापासून माणसाला

---

शीर्षकाखाली एका विद्वानांचा लेख छापून आला होता. हे एक विद्वान सन १९१५ पासून या कथेच्या संशोधनात गुंतलेले असून त्यासाठी त्यांनी सर्व पुराणे अभ्यासली आहेत. त्यांनी लिहिले आहे की, कोकणात त्याना एक अत्यंत जीर्ण पोथी पाहावयास मिळाली. त्या पोथीत प्रत्येक अध्यायाच्या शेवटी 'स्कंद पुराणे, पूर्व खण्डे' असे समाप्ति वाक्य लिहिण्यात आलेले होते. त्यांचे म्हणणे आहे की, 'स्कन्न' या शब्दाचा अर्थ "हरविलेले, जे मिळण्याची आशा नसलेले, जे नष्ट झालेले आहे" असा आहे. त्यांनी आपल्या उपरोक्त लेखात आपला हा विचार मांडला आहे की, हे 'स्कन्न पुराणे, पूर्व खण्डे' पुढे मग मुद्रणालयात शब्द जुळविणाऱ्याकडून (चुकीने) 'स्कन्ध पुराणे, रेवा खण्डे' असे छापले गेले, अन्यथा स्कंद पुराणात अशी कोणतीच गोष्ट सापडत नाही.

लेखकाच्या वरील स्पष्टीकरणावरूनही हाच निष्कर्ष निघतो की, ही कथा असलेले ते पुराण आज उपलब्ध नाही. तसेच आज मिळत असलेली कथा ही केवळ **व्रतकथाच** आहे, ती काही सत्यनारायणाची कथा नाही.

शांतीची त्याचप्रमाणे सर्व सुखांची प्राप्ती कशी होऊ शकते ?

या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे. ही कथा ऐकल्यावर मनुष्यात्म्याची ही स्मृती पुन्हा जागृत व्हावयास लागते की, "मी आत्मा सत्ययुगात देवपदाला पावलेलो होतो. श्री लक्ष्मी व श्री नारायण यांच्या राज्यकाळात सत्वप्रधान अवस्थेत मी संपूर्ण पवित्र, सर्व दैवी गुणांनी युक्त व जीवन्मुक्त होतो. नंतर त्रेतायुगात दिव्यतेच्या दोन कला कमी झाल्या आणि द्वापर युगापासून हळूहळू काम, क्रोधादी मनोविकारांच्या अधीन होता होता आता मी अध:पतनाच्या सद्य:कालीन सीमेपर्यंत येऊन पोहोचलो आहे. माझी ही दुर्दशा देहाभिमानामुळेच झालेली आहे कारण देहाभिमाना-पासूनच काम, क्रोधादी सर्व मनोविकार उत्पन्न होतात. सांप्रत साऱ्या जगाची तम:प्रधान अवस्था झालेली असून त्याने अध:पतनाची अंतीम सीमा गाठलेली आहे. या अवस्थेतून बाहेर काढून पुन्हा नराचा नारायण किंवा माणसाला देवता बनविण्यासाठी अथवा तम:प्रधान कलियुगाच्या जागी सत्वप्रधान सत्ययुगाची पुनर्स्थापना करण्यासाठी सांप्रत परमपिता शिव परमात्म्याचे प्रजापिता ब्रह्माच्या शरीरात अवतरण झालेले आहे. आता माझ्याच कल्याणासाठी परमात्मा मला संपूर्ण पवित्र व योगयुक्त व्हावयास सांगत आहे. म्हणून मला पुन्हा पवित्रतारूपी व्रत घेण्यावाचून आता गत्यंतर नाही. त्यासाठी ज्ञानरूपी प्रसाद ग्रहण करून मला योगयुक्त होणे क्रमप्राप्त आहे. तेव्हा आता मला दिरंगाई करता उपयोगी नाही अन्यथा लवकरच सर्व धनधान्याचा पालापाचोळा होईल व पापी जगाची नौका बुडून जाईल कारण पापी मनाच्या माणसांनी आपल्याच हातांनी आपल्या मानववंशाचा महाविनाश करण्यासाठी अणुबॉंब, क्षेपणास्त्रे, लेसर किरणे इत्यादी महाघातक अस्त्र-शस्त्रे निर्माण केलेली आहेत."

अशा प्रकारे स्मृतीचा लाभ झाल्याने मनुष्यात्मा पुन्हा आपल्या मूळ स्वरूपात स्थित होणे, परमपिता शिव परमात्म्याशी अनन्य प्रेम

जोडणे, जितेंद्रिय बनणे, ज्ञानप्रसाद प्राप्त करणे तसेच आहार-व्यवहार शुद्ध करण्याचे व्रत घेणे या सर्वांसाठी पुरुषार्थ करावयास लागेल. या पुरुषार्थाचे फळ म्हणजे निश्चितच गत पापकर्म दग्ध होणे, सध्याच्या जीवनात पूर्ण शांती व योगाचा आनंद प्राप्त करणे तसेच भविष्यात मुक्ती-जीवन्मुक्तीचा ईश्वरी जन्मसिद्ध अधिकार मिळविणे हेच होय. याच कारणामुळे आजही सत्यनारायण व्रत कथा करणारे लोक आमोद-प्रमोद करतात व खुशीने गात-नाचत असतात. हे या गोष्टीचे प्रतीक आहे की सत्यनारायणाची सत्यकथा ऐकणारे लोक काया-वाचा-मनाने शुद्ध व सत्य बनतात किंवा नारायणासमान कमल मुख, कमल नेत्र, कमल हस्त इत्यादी बनण्याचा पुरुषार्थ करतात आणि अशा लोकांना जगात सुख व आनंद याशिवाय काय दिसणार?

## नराचा नारायण बनण्याचे व्रत

हे आपण नेहमी पाहत आलो आहोत की, मंदिरात श्रीलक्ष्मी व श्रीनारायण यांच्या मूर्तींसमोर उभे राहून भक्तजन या शब्दांत आपले हृद्‌गत व्यक्त करतात, "आपण सर्वगुण संपन्न, १६ कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, मर्यादा पुरुषोत्तम व संपूर्ण अहिंसक आहात ..." असे म्हणूनही क्वचितच एखाद्याच्या मनात हे चिंतन सुरू होत असेल की, "श्री लक्ष्मी व श्री नारायण हे तर आपल्या सारखेच दोन डोळे, दोन कान, दोन हात, दोन पाय असणारी माणसेच आहेत पण ते पूज्य तर आपण पुजारी आहोत. हे असे का? जर माणूस या प्रश्नावर विचार करील तर त्याचे हेच निश्चित मत होईल की, नारायण सर्वगुण संपन्न व संपूर्ण निर्विकारी आहे तर आजचा नर सर्व दुर्गुण संपन्न व संपूर्ण विकारी आहे. हेच नर व नारायण यांमधील मुख्य अंतर आहे. म्हणून आता नराने आपल्यात दैवी गुण आणण्याचा तसेच संपूर्ण निर्विकारी बनण्याचा म्हणजेच पतिताचा पावन वा पुजाऱ्याचा पूज्य होण्याचा तीव्र पुरुषार्थ करणे आत्यावश्यक आहे. परंतु आज माणूस मंदिरात जाऊन श्री नारायणाचे गुणगान केल्यानंतर

स्वतःविषयी हेच कठोर सत्य सांगण्याचे धाडस करतो की, "देवा, मी नीच, पापी आहे, विकारी आहे, पतित आहे, अशांत आहे, तुझा दास आहे . . . . .देवा, माझ्यावर कृपा कर." आता सत्य स्वरूप परमपिता परमात्मा सांगत आहे की, "वत्सा, प्रथम निर्विकारी बनण्याची कृपा तू स्वतःच आपल्यावर कर."

आता प्रश्न उभा राहतो की, माणसाने निर्विकारी कसे व्हावे किंवा श्री नारायण पद कसे प्राप्त करावे ? त्याची दृष्टी व वृत्ती पवित्र कशी होईल ? त्याचे जीवन कमलपुष्पासमान कसे होईल ? त्याचा आत्मा पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे पूर्ण कलांसहित प्रकाशमान कसा होईल ? यासाठी आम्ही सत्यनारायणाची जी सत्य कथा पृष्ठ १५ ते ३० पर्यंत सांगितलेली आहे तिचे त्याने आपल्या मनात पुन्हा पुन्हा स्मरण करीत राहणे अत्यंत जरूरीचे आहे अर्थात त्याच्या मनात सतत हेच चिंतन चालूच राहावयास हवे, की, "सत्ययुगात मी सर्वगुणसंपन्न, १६ कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, मर्यादा पुरुषोत्तम, संपूर्ण अहिंसक देवता होतो. नंतर त्रेतायुगात मी १४ कला दिव्य गुण संपन्न व पूर्ण निर्विकारी होतो. द्वापर युगापसूनच मी देहाभिमानी बनलो, पूज्य असलेला मी पुजारी झालो, विकारीही बनलो. तेव्हा माझ्या केवळ ८ कला होत्या. त्या क्षीण होता होता आता शून्यावर येऊन पोहोचल्या आहेत. त्यामुळे आता कलियुगाच्या या अंत समयी मी सर्व दुर्गुण संपन्न, संपूर्ण विकारी, मर्यादाशून्य नराधम व संपूर्ण हिंसक बनलेलो आहे. पण सांप्रत मला म्हणजे ज्योतिस्वरूप आत्म्याला पुन्हा पावन देवतासमान झालेच पाहिजे. कारण आता कलियुग जाऊन सत्ययुग येणार आहे . . . ."

# प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व-विद्यालय
## पांडव भवन, आबू पर्वत, राजस्थान
संपूर्ण विश्वात एकूण 8500 सेवाकेंद्रे आहेत

**<u>महाराष्ट्रातील सेवाकेंद्रे</u>**

**मुंबई**-22 : 19,नरोत्तम निवास, किंग सर्कल स्टेशन जवळ सायन..... फोन: 24073015
**मुंबई**-56 : 'ओमशांति', स्वस्तिक सोसायटी, प्लाट नं 48,
एन.एस.3 रस्ता, जुहू योजना, विलेपार्ले..................... फोन: 26160789
**मुंबई**-7 : 23, दर-उल-मुलूक, पं.रमाबाई रोड, गांवदेवी.............. फोन: 23636585
**मुंबई**-5 : 24-25, 'गीतांजली', रेडिओ क्लबमागे, कुलाबा.......... फोन: 22830494
**मुंबई**-62 : 'आश्रय', 4 रस्ता, एम. जी. रोड,
तिवारी हॉस्पीटलजवळ, गोरेगांव (पश्चिम)............... फोन: 28741882
**मुंबई**-55 : 102, एवरेस्ट, पहिला मजला, नेहरू रोड,
पोस्ट ऑफिसजवळ, शांताक्रुज (पूर्व)..................... फोन: 26103731
**मुंबई**-77 : 23-24, शंकरछाया, 19 म. गांधी रोड, घाटकोपर (पूर्व) फोन: 25093700
**मुंबई**-80 : गालामानोर, प्लाट नं. 544 बी,
ब्लाक नं. 3,4,5 एन. एस. रोड, मुलुंड (पश्चिम).......... फोन: 25617393
**मुंबई**-92 :बी/6 गार्डन व्ह्यू अपार्टमेंट, चंदावरकर लेन, बोरीवली(प.) फोन: 28903896
**नागपूर**-22: **(मराठी साहित्य व पत्र-पाठ्यक्रम)**. 'इंद्रप्रस्थ', 8-अ, वसंत नगर, फोन: 2246793, 9373225747, 2225746, **Email : vasantnagar.ngp@bkivv.org**
**पुणे**-37 : 19/377, मिरा सोसायटी, शंकर शेट रोड.............. फोन: 26450767
**पुणे**-2 :111,कावेरी अपार्टमेंट, आंबेडकर कॉलेज जवळ,क्वाटर गेट फोन: 26353327
**पुणे**-1 ; अे-12, 'शांतीकुंज' जी.पी.ओ. समोर........................ फोन: 26122525
**नासिक**-3 : 4612, ओल्ड आग्रा रोड, भागवत निवास,
पंचवटी सेवाकुंज समोर.................................. फोन: 2518484
**अमरावती**-6 : 'सुखशांती भवन', विजय कॉलनी...................... फोन: 2574397
**अकोला**-1 : टी/3 किर्तीनगर, गोरक्षण रोड, (R.T.O.) जवळ...... फोन: 2458547
**औरंगाबाद**-5 : सुख शांती भवन, 30/35 भानुदास नगर ............ फोन: 2342199
**चंद्रपूर**-2 : 'तपस्या भवन', भानापेठ, वार्ड नं. 2, कस्तुरबा रोड....... फोन: 253574
**कोल्हापूर**-2 : 2397, शिवाजी पेठ, तटाकडील तालीम गल्ली........ फोन: 2629421
**सोलापूर**-2 : 'शिवप्रकाश भवन', 15/18 अ, कारंबा रोड, सम्राट चौ. फोन: 2325671
**जळगांव**-1 : 'ओमशांती भवन', ढाके कॉलनी, ब्रह्माकुमारीज मार्ग.... फोन: 2236259
**भुसावळ**-1 : 'राजयोग भवन', यावल रोड.............................. फोन: 222949
**भंडारा**-4 : 'शिव स्मृती भवन', कृष्ण मंदिर वार्ड...................... फोन: 252168
**वर्धा**-1 : गोपूरी, साठवणे ले-आऊट, पवनार नाका..................... फोन: 242323
**यवतमाळ**-1 : 'सुख शांती धाम', 74, ओम सोसायटी, अमी रोड.... फोन: 246615
**बुलढाणा**-1 : एकता नगर, पोस्ट क्वार्टर्सच्या मागे, सर्क्युलर रोड...... फोन: 242724
**लातूर**-31 : 'राजयोग भवन', ओल्ड औसा रोड, नंदी स्टॉप........... फोन: 200097

**मलकापूर**-1 : जिल्हा बुलढाणा, 40 बीघा, बंदे फ्लोर मिल जवळ..... फोन: 260386
**नांदेड**-5 : 'सुख शांती भवन', कैलाश नगर........................ फोन: 251649
**सांगली**-16 : ब्लॉक नं. 4, प्लाट नं. 5, साखर कारखाना............. फोन: 2310342
**बीड**-22 : 'दिव्य दर्शन भवन', आदर्श नगर, पांगरी रोड...............फोन: 222915
**गोंदिया**-1 : 'स्वदर्शन भवन', न्यू लक्ष्मी नगर........................ फोन: 250264
**सातारा**-1 : कल्याणी नगर, झेड.पी.कँपच्या समोर .................. फोन: 229795
**मालेगांव**-3 : (जि. नाशिक) 'लाईट हाऊस', 310, संगमेश.......... फोन: 250495
**पणजी** (गोवा)-1 : ई-98 माळा.................................. फोन: 2226044
**पणवेल**-6 : (जि. कुलाबा) आदिती, प्लॉट नं.107,
रूम नं. 102,103, मीडल क्लास सोसायटी....... फोन: 27452618
**कल्याण**-1 : (जि. ठाणा) 'स्मृती बिल्डिंग', फर्स्ट फ्लोअर,
अहिल्याबाई चौक.................................. फोन: 2209959
**हिंगणघाट**-1 : (जि. वर्धा) 'ज्ञान विज्ञान भवन', 148, यशवंत नगर... फोन: 245028
**गडचिरोली**-5 : 'शिवशक्ति भवन', शिवाजी वाचनालयाजवळ ....... फोन: 232442
**देगलूर**-17 : (जि. नांदेड) 'अमृतकुंड', दत्त कृपा सोसायटी-2......... फोन: 255607
**उदगीर**-17 :(जि.उस्मानाबाद) 'सद् भावना भवन', 3-2-1014/1,
ओमशांती कॉलनी.................................. फोन: 256340
**उमरेड**-3 : (जि. नागपूर) 'पावन धाम', कावरा पेठ.................. फोन: 242787
**वरूड**-6 : (जि. अमरावती) 'ज्ञानदीप भवन', गोमापूरवाडी............ फोन: 234073
**पुसद**-4 : (जि. यवतमाळ) 'आत्मदर्शन भवन', विठाबाई नगर........ फोन: 248333
**परतवाडा**-5 : (जि. अमरावती) 'शिवदर्शन भवन', मोहन नगर.........फोन: 221353

## भारतातील अन्य सेवा केंद्रे

**दिल्ली**-5 : पांडव भवन, 25 न्यू रोहतक रोड, करोल बाग............ फोन: 23628976
**कोलकाटा**-20 : 1/अ, आशुतोष मुखर्जी रोड........................फोन: 24753521
**अहमदाबाद**-22 : 'सुखशांती भवन', भुलाभाई पार्क रोड, कांकरिया.. फोन: 25324360
**चेन्नई**-40 : 'शांतिधाम', प्लॉट नं. 3702-96, 3रा एव्हेन्यू अन्नानगर. फोन: 26267441
**चंदीगड**-20 : 'राजयोग भवन', सेक्टर 33 अे.................... फोन: 2601339

## OVERSEAS

**LONDON**-NW 10-2 HH : Global Co-operation House, 65
Pound Lane, Ph : 44-20-8727 3350
**NEW YORK**, 10017:Brahmakumari's Office at U.N.Room
No. 436, 866 UN Plaza (Ph :1-212-688 1335)
**NAIROBI**- (Kenya) Global Museum, Maua close, Westlands,
PO Box 123-00606-Ph-254-20-3743572, 3741239
**SYDNEY** NSW 2131- 'Indraprasth' 78 Alt Street
Ashfield ....Ph : 61-2-9799 9880
**PARIS**-75020, 74 Rue Orfila, Ph : 33-1-4358 4427
**BERLIN** Crellestr,-26...Ph-49-30-7813059
**GENEVA** (Switzerland) : 12 rue. de cour 86, Ph 41-21-7223610

# आत्मदर्शन, परमात्मदर्शन व विश्वदर्शन

करवून जीवनांत संपूर्ण शांती, समाधान व
मानसिक सुख मिळवून देणारे

# "ईश्वरी ज्ञान व राजयोगाचा"
# पत्र-पाठ्यक्रम

## प्रश्नोत्तरांच्या सोईसह सात आकर्षक पाठ

पाठ 1 - शरीर आणि आत्मा
पाठ 2 - आत्मा आणि परमात्मा
पाठ 3 - परमात्म्याचे दिव्य कर्तव्य
पाठ 4 - संन्यासमार्ग, भक्तिमार्ग आणि ज्ञानमार्ग
पाठ 5 - मनुष्य सृष्टीरूपी कल्पवृक्ष
पाठ 6 - मनुष्यात्म्याच्या 84 जन्मांची कहाणी
पाठ 7 - सहज राजयोग

संपूर्ण पाठ्यक्रमाचे शुल्क फक्त पंचवीस रुपये
(मनीआर्डरने) आपल्या पूर्ण पत्त्यासह पाठवा

प्रकाशक- मराठी साहित्य विभाग
निर्देशिका पत्र-पाठ्यक्रम
प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय
इंद्रप्रस्थ भवन, दीक्षाभूमि चौकाजवळ,
8-अ, वसंत नगर, नागपूर-440 022
☎ -2246793, 2225746, 9373225747
Email : vasantnagar.ngp@bkivv.org